ज्ञानगंगा घरोघरी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे

# परिवहन क्षेत्रातील व्यक्तींसाठी

# बी. ए. (मार्गपरिवहन) शिक्षणक्रम

## माहितीपुस्तिका

शिक्षणक्रम संकेतांक (**Programme Code) : C19**

# बी. ए. (मार्ग परिवहन) पदवी शिक्षणक्रम माहितीपुस्तिका

## शिक्षणक्रम संकेतांक (Programme Code) : (G64)

### *अनुक्रमणिका*


शैक्षणिक वेळापत्रक ........ ३

१. केंद्राचा परिचय ........ ४

२. शिक्षणक्रमाविषयी ........ ४
- २.१ शिक्षणक्रमाची उद्दिष्टे
- २.२ शिक्षणक्रमाची संरचना
- २.३ अध्ययनपद्धती

३. प्रथम वर्ष बी.ए.(मार्ग परिवहन)/पदविका ........ ५
- ३.१ प्रवेश पात्रता
- ३.२ प्रथम वर्ष :श्रेयांक पद्धती व अभ्यासक्रम संरचना
- ३.३ शिक्षणक्रम शुल्क
- ३.४ मूल्यमापन प्रक्रिया

४. द्वितीय वर्ष बी.ए. (मार्ग परिवहन)/प्रगत पदविका ........ ७
- ४.१ प्रवेश पात्रता
- ४.२ अभ्यासक्रम संरचना
- ४.३ शिक्षणक्रम शुल्क
- ४.४ मूल्यमापन प्रक्रिया
- ४.५ श्रेयांकांतर शिक्षणक्रम शुल्क (द्वितीय वर्ष)

५. तृतीय वर्ष बी.ए. (मार्ग परिवहन) ........ ८
- ५.१ प्रवेश पात्रता
- ५.२ अभ्यासक्रम संरचना
- ५.३ शिक्षणक्रम शुल्क
- ५.४ मूल्यमापन प्रक्रिया

६. कालावधी ........ ९

७. माध्यम ........ ९

८. नोंदणी प्रक्रिया ........ ९

९. विभागीय केंद्रे ........ १०

१०. विशेष सूचना/संपर्कासाठी ........ ११

११. परिशिष्टे ........ १२
- परिशिष्ट – १ : विद्यार्थी सहायता आणि विद्यार्थी कल्याण योजना
- परिशिष्ट –२ : शासन निर्णय (यू.जी.सी.)
- परिशिष्ट –३ : १०वी व १२वी समकक्षतेबाबत शासन निर्णय
- परिशिष्ट –४ : शासन निर्णय

# बी. ए. (मार्ग परिवहन) पदवी शिक्षणक्रम (G64)

## शैक्षणिक वेळापत्रक

**महत्त्वाची माहिती :**

१. शैक्षणिक वर्ष २०१४-१५ साठी बी. ए. (मार्ग परिवहन) प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षास प्रवेश सुरू.

२. प्रथम वर्ष बी. ए. (मार्ग परिवहन) चे पहिले सत्र(सहा महिने) यशस्वीपणे पूर्ण केल्यावर विद्यार्थ्यास मार्ग परिवहनातील प्रमाणपत्र (C99) प्राप्त होईल.

३. प्रथम वर्ष बी. ए. (मार्ग परिवहन) यशस्वीपणे पूर्ण केल्यावर विद्यार्थ्यास मार्ग परिवहनातील पदविका (G62) प्राप्त होईल.

४. प्रथम व द्वितीय वर्ष बी. ए. (मार्ग परिवहन) यशस्वीपणे पूर्ण केल्यावर विद्यार्थ्यास मार्ग परिवहनातील प्रगत पदविका (G63) प्राप्त होईल.

५. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष यशस्वीपणे पूर्ण केल्यावर विद्यार्थ्यास बी. ए. (मार्ग परिवहन) पदवी (G64) प्राप्त होईल.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०१. | प्रवेश सुरुवात | | : | ०१ ऑगस्ट २०१४ |
| ०२. | प्रवेश अंतिम मुदत | | : | १५ सप्टेंबर २०१४ |
| ०३. | अध्ययन साहित्य (पुस्तके) उपलब्ध | | : | ऑक्टोबर २०१४ अखेरपर्यंत |
| ०४. | अभ्यासकेंद्रावर संपर्कसत्रांचे आयोजन | | : | १५ सप्टेंबर २०१४ ते एप्रिल २०१५ |
| ०५. | अंतिम परीक्षा | - प्रथम वर्ष | : | दोन सत्रातः<br>पहिले सत्र : डिसेंबर २०१४/जानेवारी २०१५<br>दुसरे सत्र : मे/जून २०१५ |
| | | - द्वितीय वर्ष | : | मे / जून २०१५ |
| | | - तृतीय वर्ष | : | मे / जून २०१५ |
| ०६. | निकाल | | : | परीक्षा झाल्यानंतर ४५ दिवसांच्या आत. |

**टीप :** ०१. वेळापत्रकात प्रसंगी बदल होऊ शकतो. झालेला बदल त्या-त्या वेळी अभ्यासकेंद्रांना कळविला जातो. त्यासाठी अभ्यासकेंद्रांशी सतत संपर्कात राहावे.

०२. दिलेल्या मुदतीतच विद्यार्थ्यांना प्रवेश मिळेल. त्यानंतर प्रवेश दिला जाणार नाही.

०३. प्रवेशाच्या अंतिम मुदतीनंतर कोणत्याही परिस्थितीत प्रवेश-अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

०४. एकदा बी.ए. (मार्ग परिवहन)ला प्रवेश घेतल्यावर शाखाबदल, माध्यम बदल करता येणार नाही.

०५. एकदा घेतलेले अभ्यासकेंद्र शिक्षणक्रम पूर्ण होईपर्यंत बदलता येणार नाही.

**वेबसाईट : http://ycmou.digitaluniversity.ac**

## १. केंद्राचा परिचय

सहयोग आणि विशेष उपक्रम केंद्राची स्थापना डिसेंबर २०११ मध्ये झाली. समाजातील प्रामुख्याने वंचित घटकांकरिता शिक्षणाची संधी उपलब्ध करून देऊन त्यांचे सक्षमीकरण करण्याच्या मूळ हेतूने या केंद्राची स्थापना झाली आहे. त्या दृष्टीने नावीन्यपूर्ण शिक्षणक्रम विकसित करण्यासाठी हे केंद्र सतत प्रयत्नशील आहे. त्याचबरोबर शिक्षणाचे हे कार्य कोणत्याही एका संस्थेने स्वतंत्रपणे हाताळण्यापेक्षा इतर संस्थांचे व तज्ज्ञ व्यक्तींचे सहकार्य मिळविणे हे अत्यंत गरजेचे आहे, या जाणिवेतून या केंद्राची निर्मिती झाली आहे आणि याच भूमिकेतून या केंद्राची वाटचाल राहिली आहे.

**उद्देश :** समाजातील वेगवेगळ्या गटांना त्यांच्या गरजांनुरूप शैक्षणिक तरतुदी उपलब्ध करून त्यांना अधिक सक्षम बनविणे.

## २. शिक्षणक्रमाविषयी

मार्ग परिवहन क्षेत्रात काम करणाऱ्यांना विशेषतः वाहनचालकांना रोजगार/व्यवसायाच्या विविध संधी प्राप्त होण्याकरिता आवश्यक असणारी कौशल्ये संपादित करता यावी या हेतूने या शिक्षणक्रमाची रचना करण्यात आली आहे. तात्त्विक व उपयोजित अशा दोन्ही दृष्टीने या शिक्षणक्रमातील अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील आयुष्यात उपयोगी ठरावेत, या हेतूने अभ्यास–विषयांची मांडणी केली आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी बौद्धिक कौशल्ये व व्यावसायिक क्षमता यातील परस्परसंबंधाची सांगड घालणे हे या शिक्षणक्रमाचे वैशिष्ट्य आहे.

### २.१ शिक्षणक्रमाची उद्दिष्टे

- ❑ सामाजिक प्रतिष्ठा उंचावणे
- ❑ आत्मविश्वास वाढविणे
- ❑ व्यसायोपयोगी ज्ञान देणे
- ❑ जीवनोपयोगी कौशल्ये विकसित करणे
  उदा. संभाषण कौशल्ये, सामाजिक वर्तन, कौटुंबिक जीवन, शारीरिक व मानसिक स्वास्थ्याशी निगडित कौशल्ये इ.
- ❑ शिक्षणाच्या माध्यमातून नोकरी मिळण्याची, पदोन्नतीची तसेच जोडव्यवसायाची शक्यता वाढविणे

### २.२ शिक्षणक्रमाची संरचना

बी. ए. (मार्ग परिवहन) पदवी शिक्षणक्रमाची मांडणी पुढीलप्रमाणे करण्यात आली आहे –

- ✣ प्रथम वर्ष बी.ए. (मार्ग परिवहन) : या वर्षाचे पहिले सत्र (६ महिने) यशस्वीपणे पूर्ण केल्यावर विद्यार्थ्याला मार्ग परिवहनातील प्रमाणपत्र (Certificate in Road Transportation) प्राप्त होईल. तसेच दुसरे सत्र (६ महिने) यशस्वीपणे पूर्ण केल्यावर विद्यार्थ्याला मार्गपरिवहनातील पदविका (Diploma in Road Transportation) प्राप्त होईल.
- ✣ द्वितीय वर्ष बी.ए. (मार्ग परिवहन) : हे वर्ष यशस्वीपणे पूर्ण केल्यावर विद्यार्थ्याला मार्ग परिवहनातील प्रगत पदविका (Advanced Diploma in Road Transportation) प्राप्त होईल.
- ✣ तृतीय वर्ष बी.ए.(मार्ग परिवहन) : हे वर्ष यशस्वीपणे पूर्ण केल्यावर विद्यार्थ्याला मार्ग परिवहनातील पदवी [ B.A. (Road Transportation) ] प्राप्त होईल.

### २.३ अध्ययन पद्धती

ज्या विद्यार्थ्यांना दररोज महाविद्यालयात जाऊन शिक्षण घेता येत नाही, तसेच अध्ययन करण्यासाठी पूर्ण वेळ देता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी मुक्त विद्यापीठाने स्वतंत्रपणे अध्ययन पद्धती विकसित केली आहे. त्यात पुढील घटकांचा समावेश आहे.

(१) स्वयं–अध्ययनावर आधारित खास तयार करण्यात आलेली पुस्तके.
(२) संगणकाद्वारे शिक्षण (ई–लर्निंग) – प्रथम वर्षासाठी
(३) कम्युनिटी रेडिओद्वारे शिक्षण – प्रथम वर्षासाठी
(४) प्रात्यक्षिकांसंबंधी माहितीसाठी डी.व्ही.डी द्वारे शिक्षण – प्रथम वर्षासाठी
(५) तज्ज्ञ व्यक्तींचे संपर्कसत्रात मार्गदर्शन.
(६) वेब–रेडियो.

या अध्ययन पद्धतीत विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासक्रमाचा तपशील न देता, त्यावर आधारित दर्जेदार अध्ययन पुस्तकांचा संचही देण्यात येतो. प्रवेश शुल्कातच ही अध्ययन पुस्तके देण्यात येतात व ती विद्यार्थ्याला स्वतःकडे कायम ठेवता येतात. ही स्वयं–अध्ययन पुस्तके अन्य पाठ्यपुस्तकांपेक्षा निराळ्या पद्धतीने लिहिलेली असतात. ह्या पाठ्यपुस्तकात एका वाचनात समजावून घेता येईल अशा प्रकारे विषयांची छोट्या छोट्या घटकांत विभागणी केलेली असते. उदाहरणार्थ, उदाहरणे, आलेख, चित्रे, इत्यादींच्या साहाय्याने विषयांची मांडणी सुबोधपणे करण्यात येते. ह्या पुस्तकांची छपाई विद्यार्थ्यांचे अध्ययन सुलभपणे व्हावे या दृष्टीने करण्यात आलेली असते. तसेच पाठ्यांशाखाली काही प्रश्न दिलेले असतात, तो तो भाग वाचून झाल्यावर हे प्रश्न विद्यार्थ्याने सोडविल्यास तो भाग आपल्याला कितपत समजला ह्याचा त्याला स्वतःलाच पडताळा घेता येतो. जर त्याला काही प्रश्न सोडविता आले नाहीत, तर त्याने तो भाग पुन्हा वाचून उत्तरे मिळवावयाची असतात. एवढे करूनही काही प्रश्नांची उत्तरे मिळू शकत नसतील तर ते प्रश्न अभ्यासकेंद्रावरील संपर्कसत्रात मार्गदर्शक व्यक्तींशी (समंत्रक – Counsellor) चर्चा करून त्यांची उत्तरे मिळविता येतात.

विद्यापीठाने प्रथम वर्षासाठी काही ई– लर्निंग मोड्युल्स तयार केले आहेत. ते विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळी उपलब्ध असतील तसेच विद्यापीठाने या शिक्षणक्रमावर आधारित काही खास रेडिओ प्रोग्राम्स तयार करून घेतले आहेत ज्याची अधिक माहिती विद्यार्थ्याला अभ्यासकेंद्रावर मिळेल.

परिवहन क्षेत्रातील व्यक्तींचे कौशल्ये लक्षात घेता या शिक्षणक्रमासाठी प्रात्यक्षिकांसंबधी माहिती देणाऱ्या दोन दृक–श्राव्य चित्रफितींचा संच तयार करण्यात आलेला आहे, जो विद्यार्थ्याला प्रथम वर्षाच्या अध्ययन पुस्तकांबरोबर देण्यात येईल.

विद्यार्थ्याला आपल्या सोयीच्या ठिकाणचे अभ्यासकेंद्र निवडता येते. या अभ्यासकेंद्रावर प्रत्येक अभ्यासक्रमासाठी सामान्यतः सुटीच्या दिवशी वा कार्यालयीन वेळेनंतर संपर्कसत्रे घेण्यात येतात. त्या त्या विषयातील तज्ज्ञ मार्गदर्शक ह्या संपर्कसत्रात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. मात्र हे मार्गदर्शन केवळ व्याख्यानांच्या स्वरूपाचे असत नाही. मार्गदर्शकाकडून विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची/शंकांची उत्तरे मिळतात तसेच आपल्या प्रगतीविषयी विद्यार्थ्याला माहिती घेता येते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी संपर्कसत्रांना उपस्थित राहणे त्यांच्या हिताचे आहे. विद्यार्थ्याने वरील सर्व अध्ययन–सुविधांचा जास्तीतजास्त उपयोग करून घ्यावा. आपल्याला मिळणारा वेळ लक्षात घेऊन मिळणाऱ्या वेळेचा नियोजनपूर्वक उपयोग करावा. केवळ पाठांतराद्वारे केलेला अभ्यास हा खरा अभ्यास नसून विषयाचे सुस्पष्ट आकलन होणे व त्याचा योग्य ठिकाणी उपयोग करता येणे हे चांगल्या अभ्यासपद्धतीचे मर्म आहे. त्यामुळे प्रात्यक्षिके व सराव यांवर भर देऊन विद्यार्थ्याने अभ्यास करावा अशी अपेक्षा आहे.

# ३. प्रथम वर्ष बी. ए. (मार्ग परिवहन)/पदविका

## ३.१ प्रवेश पात्रता

वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या आणि खालीलपैकी पात्रतेचा कोणताही एक निकष पूर्ण करणारी व्यक्ती :

(१) य.च.म.मुक्त विद्यापीठाचा पूर्वतयारी शिक्षणक्रम पूर्ण (किमान ४० टक्के गुण).

(२) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची इयत्ता बारावी (एच.एस.सी.) किंवा इतर राज्यांतील समकक्ष परीक्षा उत्तीर्ण.

(३) १९७५ पूर्वीची माध्यमिक शालांत परीक्षा (११ वी) उत्तीर्ण.

(४) एस.एस.सी. उत्तीर्ण झाल्यानंतर सलग किमान २ वर्षे मुदतीचा सरकारमान्य पदविका/प्रमाणपत्र शिक्षणक्रम उत्तीर्ण. उदाहरणार्थ, डी.सी.ई, डी.एम.ई., डी.ई.ई., डी.फार्म, डेअरी टेक., टी.डी., ए.टी.डी., एन.सी.टी.व्ही.टी., आय.टी.आय., एम.सी.व्ही.सी.

(५) य. च. म. मुक्त विद्यापीठाचा स्वयं–साहाय्य गट प्रेरक–प्रेरिका शिक्षणक्रम उत्तीर्ण असणारे. [विद्वत परिषद सभा दि. २४/२/०५ ठराव क्र. बी१००/०५/४१ ( बी –१/एफ–१७३/२००५/६३) अन्वये ]

### विशेष सूचना

(१) प्रवेश–अर्ज भरताना खालील कागदपत्रे अपलोड करणे अत्यंत आवश्यक आहे.

(अ) शाळा सोडल्याचा दाखला

(आ) शैक्षणिक पात्रतेबाबतची गुण–पत्रके.

(२) विद्यार्थी इतर विद्यापीठात शिक्षण घेत असतानाही ह्या शिक्षणक्रमास प्रवेश घेऊ शकतो. उदाहरणार्थ, ए.टी.डी., एलएल.बी., बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी., इत्यादी शिक्षणक्रम चालू असताना बी.ए.(मार्ग परिवहन) प्रथम वर्षास प्रवेश घेता येईल. त्यासाठी स्थलांतराच्या दाखल्याची आवश्यकता नाही.

## ३.२ प्रथम वर्ष : श्रेयांक पद्धती व अभ्यासक्रम संरचना

मुक्त शिक्षणपद्धतीत अध्ययनतासांचे मापन 'श्रेयांका'च्या परिमाणात केले जाते. साधारणपणे ३० अध्ययनतासांचा अभ्यास म्हणजे १ श्रेयांक. या अभ्यासात अध्ययन पुस्तकांचे वाचन, टिपण काढणे, मनन–चिंतन करणे, प्रश्नोत्तरे लिहिणे, संपर्कसत्रातील मार्गदर्शन, इत्यादींचा समावेश आहे.

सामान्यतः सहा श्रेयांकांचा म्हणजेच १८० अध्ययन तासांचा एक अभ्यासक्रम असतो.

### ❑ अभ्यासक्रम संरचना

| *अ.क्र.* | *अभ्यासक्रम (व अभ्यासक्रम संकेतांक)* | *श्रेयांक* | *एकूण संपर्कसत्रे* |
|---|---|---|---|
| | सत्र क्र. १ | १६ | |
| १. | रस्ते वाहतुकीचा संक्षिप्त आढावा (RTC001) | ०४ | ०४ |
| २. | वाहनांचा परिचय (RTC002) | ०६ | ०८ |
| ३. | रस्त्यांचा परिचय (RTC003) | ०६ | ०८ |
| | सत्र क्र. २ | १२ | |
| ४. | वाहन चालविण्याची नियमावली व जबाबदारी (RTC004) | ०६ | ०९ |
| ५. | मी आणि माझे भविष्य (RTC005) | ०६ | ०९ |

## ३.३ शिक्षणक्रम शुल्क

| | | | |
|---|---|---|---|
| विद्यापीठ शुल्क | : | रु. | १४७५=00 |
| अभ्यासकेंद्र शुल्क | : | रु. | ७२५=00 |
| **एकूण शुल्क** | **:** | **रु.** | **२२00=00** |

### ● विद्यापीठ शुल्काचा तपशील

| *अ.क्र.* | *तपशील* | *शुल्क (रु.)* |
|---|---|---|
| 0१. | प्रवेश व नोंदणी शुल्क | १00=00 |
| 0२. | शैक्षणिक शुल्क | ५९५=00 |
| 0३. | अंतर्गत मूल्यमापन | ७0=00 |
| 0४. | परीक्षा शुल्क | ४00=00 |
| 0५. | पदविका प्रमाणपत्र | ३00=00 |
| 0६. | आपत्कालीन सहायता निधी | १0=00 |
| | **एकूण शुल्क (रु.)** | **१४७५=00** |

### ● शुल्क परत मिळण्याबाबत

ज्या विद्यार्थ्यांना आपला प्रवेश रद्द करावयाचा असेल त्यांना पुढीलप्रमाणे वजावट करून शुल्क परत केले जाईल.

- प्रवेश घेतल्यापासून (प्रवेश शुल्क भरलेल्या चलनावरील दिनांकानुसार).
- १५ दिवसांपर्यंत प्रवेश रद्द करण्याचा अर्ज प्राप्त झाल्यास १५% वजावट.
- ३0 दिवसांपर्यंत प्रवेश रद्द करण्याचा अर्ज प्राप्त झाल्यास ५0% वजावट.
- ४५ दिवसांपर्यंत प्रवेश रद्द करण्याचा अर्ज प्राप्त झाल्यास ७५% वजावट.

(प्रवेश रद्द करण्याबाबतचा अर्ज विद्यापीठास प्राप्त झालेल्या दिनांकापासून वरील कालावधी मोजण्यात येईल.)

४५ दिवसांनंतर प्रवेश रद्द करण्याचा अर्ज प्राप्त झाल्यास शुल्क परत केले जाणार नाही. मात्र विद्यार्थ्यास प्रवेश रद्द करावयाचा असेल तर त्यांनी तसे केंद्रप्रमुखांमार्फत कळविणे आवश्यक आहे. तसेच प्रवेश रद्द करण्याच्या अर्जासोबत भरलेल्या शुल्काच्या चलनाची मूळ पावती आणि सुस्थितीत पुस्तकेअभ्यासकेंद्रात परत केल्याचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

## ३.४ मूल्यमापन प्रक्रिया

**अंतर्गत मूल्यमापन :** प्रथम वर्षाच्या पहिल्या सत्राच्या तीन अभ्यासक्रमांची (एकत्रित) एक चाचणी परीक्षा अंतिम परीक्षेच्या अगोदर घेण्यात येईल. या सत्राची परीक्षा ही ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येईल व सर्व प्रश्न हे वस्तुनिष्ठ स्वरूपाचे असतील. ही परीक्षा एकूण ६0 गुणांची (प्रत्येक अभ्यासक्रमाला २0 गुण) व ६0 मिनिटे कालावधीची असेल.

तसेच सत्र - २ ची चाचणी परीक्षा ही दोन अभ्यासक्रमांची (एकत्रित) ४0 गुणांची (प्रत्येक अभ्यासक्रमाला २0 गुण) व ३0 मिनिटे कालावधीची घेण्यात येईल.

**सत्र - १ अंतिम परीक्षा :** (डिसेंबर २0१४)

तुम्ही चार महिन्यांत जो अभ्यास करणार आहात, त्यात किती प्रगती केली आहे याचा तुम्हाला अंदाज घेता यावा यासाठी तुमची परीक्षा घेण्यात येते. त्या आधारे तुमचा गुणवत्ता निर्देशांक ठरविण्यात येतो. या प्रक्रियेला 'मूल्यमापन' असे म्हणतात. अंतिम परीक्षा खालील तीन पुस्तकांवर आधारित असेल व सर्व प्रश्न हे वस्तुनिष्ठ स्वरूपाचे असतील.

पुस्तक १ः रस्ते वाहतुकीचा संक्षिप्त आढावा (RTC001)
पुस्तक २ः वाहनांचा परिचय (RTC002)
पुस्तक ३ः रस्त्यांचा परिचय (RTC003)

**सत्र - २** अंतिम परीक्ष : (मे/जून २0१५)

सत्र-१ प्रमाणे सत्र-२ ची परीक्षा वस्तुनिष्ठ स्वरूपाची असेल. सत्र-१ ची परीक्षा अनुत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांनादेखील सत्र-२ची परीक्षा देता येईल. सत्र-२ ची अंतिम परीक्षा खालील दोन पुस्तकांवर आधारित असेल.

पुस्तक ४ : वाहन चालविण्याची नियमावली व जवाबदारी (RTC004)
पुस्तक ५ : मी आणि माझे भविष्य (RTC005)

१. सत्र १ व २ मधील प्रत्येक अभ्यासक्रमामध्ये उत्तीर्ण होण्याकरिता विद्यार्थ्याने अंतिम परीक्षेत ८0 गुणांपैकी कमीतकमी ३२ गुण मिळविणे तसेच अंतिम परीक्षा व चाचणी परीक्षा या दोन्हीमध्ये एकूण किमान ४0 गुण मिळविणे अनिवार्य.
२. सत्र-१ च्या डिसेंबर २0१४ मधील परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी मे/जून २0१५ च्या पुनर्परीक्षेसाठी परीक्षा अर्ज भरावा.
३. परीक्षेचा निकाल परीक्षेनंतर ४५ दिवसांच्या आत जाहीर करण्यात येईल. गुणपत्रक आपण आपल्या अभ्यासकेंद्रातून घ्यावे.
४. प्रथम वर्ष बी.ए. (मार्ग परिवहन) अनुत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांना द्वितीय वर्ष बी.ए. (मार्ग परिवहन)ला प्रवेश मिळेल. त्यामुळे निकालाची वाट न पाहता, विद्यार्थ्यांनी द्वितीय वर्षासाठी प्रवेश घ्यावा.

# ४. द्वितीय वर्ष बी. ए. (मार्ग परिवहन)/ प्रगत पदविका

## ४.१ प्रवेश पात्रता

खालीलपैकी कोणतीही एक पात्रता पूर्ण असणाऱ्या व्यक्ती –

(१) य.च.म.मुक्त विद्यापीठात यापूर्वी बी.ए. (मार्ग परिवहन) प्रथम वर्षास प्रवेश घेतलेले सर्व विद्यार्थी.

(२) १०वी उत्तीर्णतेनंतर शासनमान्य व मान्यताप्राप्त विद्यापीठांतील तीन **वर्ष कालावधी असलेले डिप्लोमा** इन मॅकेनिकल इंजिनीअरिंग, डिप्लोमा इन ऑटोमोबाईल इंजिनीअरिंग, डिप्लोमा इन प्रॉडक्शन इंजिनीअरिंग उत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या श्रेयांकांतराच्या नियमानुसार (Credit Transfer Rule) द्वितीय वर्षास प्रवेश मिळेल. **द्वितीय वर्षास प्रवेश घेताना विद्यार्थ्यांना प्रथम वर्षातील द्वितीय सत्राचा एक विषय म्हणजेच RTC004 (Rules and Responsibilities) हाही विषय निवडणे अनिवार्य राहील. या विषयाची परीक्षा विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने देणे अनिवार्य राहील.** तसेच पहिल्या वर्षाच्या प्रथम सत्राचे व द्वितीय सत्राचे बाकी सर्व विषयांची (४ अभ्यासक्रमांची) त्यांना सूट देण्यात येईल. अशा विद्यार्थ्यांनी वरीलपैकी उत्तीर्ण झालेल्या पदविका प्रमाणपत्राची किंवा गुणपत्रकाची प्रत अपलोड करावी, अन्यथा अंतिम प्रवेश दिला जाणार नाही.

## ४.२ अभ्यासक्रम संरचना

| *अ.क्र.* | *अभ्यासक्रम (व अभ्यासक्रम संकेतांक)* | *श्रेयांक* | *एकूण संपर्कसत्रे* |
|---|---|---|---|
| १. | परिवहन व्यवसाय संघटन आणि प्रशासन (BRT201) | ०६ | ०९ |
| २. | परिवहन क्षेत्रातील कायदे व नियम (BRT202) | ०६ | ०९ |
| ३. | वाहन तंत्रज्ञानाची मूलतत्त्वे (BRT203) | ०६ | ०९ |
| ४. | मार्ग परिवहनाचे अर्थशास्त्र (BRT205) | ०६ | ०९ |
| ५. | अध्ययन कौशल्यांचा अधिष्ठान अभ्यासक्रम (OPN101) | ०६ | ०९ |
| ६. | जीवन कौशल्ये (SFT001) | ०६ | ०९ |

## ४.३ शिक्षणक्रम शुल्क

| | | | |
|---|---|---|---|
| विद्यापीठ शुल्क | : | रु. | २०७५=०० |
| अभ्मासकेंद्र शुल्क | : | रु. | ९२५=०० |
| **एकूण शुल्क** | **:** | **रु.** | **३०००=००** |

● **विद्यापीठ शुल्काचा तपशील**

| *अ.क्र.* | *तपशील* | *शुल्क (रु.)* |
|---|---|---|
| ०१. | प्रवेश व नोंदणी शुल्क | १००=०० |
| ०२. | शैक्षणिक शुल्क | १०७०=०० |
| ०३. | अंतर्गत मूल्यमापन | ७०=०० |
| ०४. | परीक्षा शुल्क | ५२५=०० |
| ०५. | प्रगत पदविका प्रमाणपत्र | ३००=०० |
| ०६. | आपत्कालीन सहायता निधी | १०=०० |
| | **एकूण शुल्क (रु.)** | **२०७५=००** |

## ४.४ मूल्यमापन प्रक्रिया

■ **अंतर्गत मूल्यमापन**

द्वितीय वर्षाचा OPN101 हा अभ्यासक्रम वगळता इतर पाच अभ्यासक्रमांची (एकत्रित) एक चाचणी परीक्षा अंतिम परीक्षेच्या अगोदर घेण्यात येईल. ही परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येईल व यातील सर्व प्रश्न हे वस्तुनिष्ठ स्वरूपाचे असतील. ही परीक्षा एकूण १०० गुणांची (प्रत्येक अभ्यासक्रमाला २० गुण) ९० मिनिटे कालावधीची असेल. OPN101 या अभ्यासक्रमासाठी अंतर्गत मूल्यमापनाचे गुण नसतील.

■ **अंतिम मूल्यमापन**

**द्वितीय वर्षाच्या सहा अभ्यासक्रमांपैकी पाच अभ्यासक्रमांची परीक्षा ही मे/जून २०१५ मध्ये Online पद्धतीने घेण्यात येईल.** तसेच OPN101 या अभ्यासक्रमाची अंतिम परीक्षा ही लेखी स्वरूपाची घेण्यात येईल. ऑनलाईन परीक्षा पुस्तकांवर आधारित असेल व सर्व प्रश्न हे वस्तुनिष्ठ स्वरूपाचे असतील.

(१) द्वितीय वर्षाचा OPN101 हा अभ्यासक्रम वगळता इतर प्रत्येक अभ्यासक्रमामध्ये उत्तीर्ण होण्याकरिता विद्यार्थ्याने अंतिम परीक्षेत ८० गुणांपैकी कमीत-कमी ३२ गुण

मिळविणे अनिवार्य आहे. तसेच अंतिम परीक्षा व चाचणी परीक्षा या दोन्हींमध्ये एकूण किमान ४० गुण मिळविणे अनिवार्य आहे.

(२) OPN101 या अभ्यासक्रमाची लेखी परीक्षा १०० गुणांची असेल त्यात उत्तीर्ण होण्यासाठी किमान ४० गुण मिळविणे अनिवार्य आहे.

**(३) जे विद्यार्थी अंतिम परीक्षेत अनुत्तीर्ण होतील त्यांनाच पुनर्परीक्षार्थींचे परीक्षा अर्ज भरता येतील. यासाठी विद्यार्थ्यांनी अभ्यास-केंद्राच्या संपर्कात राहणे आवश्यक व महत्त्वाचे आहे.**

**(४) द्वितीय / तृतीय वर्ष बी.ए. (मार्ग परिवहन) अभ्यासक्रमाच्या परीक्षेच्या गुणांवरच पदवी देण्यात येईल.**

## ४.५ श्रेयांकांतर शिक्षणक्रम शुल्क (द्वितीय वर्ष)

१०वी नंतर शासनमान्य/मान्यताप्राप्त विद्यापीठातील **तीन वर्षाचा** डिप्लोमा इन मॅकेनिकल इंजिनीअरिंग/डिप्लोमा इन ऑटोमोबाईल इंजिनीअरिंग / डिप्लोमा इन प्रोडक्शन इंजिनीअरिंग पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना द्वितीय वर्ष बी.ए. (मार्ग परिवहन) च्या प्रवेशासाठी खालील प्रमाणे शुल्क आकारण्यात येईल.

■ **विद्यापीठ शुल्क**

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) द्वितीय वर्ष शुल्क | : | रु. | ३०००=०० |
| (आ) श्रेयांकांतरण शुल्क*: | | रु. | १०००=०० |
| **एकूण शुल्क :** | | **रु.** | **४०००=००** |

***(सदर शुल्क RTC 004 या अभ्यासक्रमाच्या शुल्कासहित आहे)**

**टीप** : श्रेयांकांतर प्रवेश घेतलेले विद्यार्थी प्रगत पदविका मिळविण्यास पात्र ठरणार नाहीत. प्रगत पदविका ही बी.ए. (मार्ग परिवहन) चे पहिले व द्वितीय वर्ष यशस्वीपणे उत्तीर्ण केल्यावरच प्राप्त होते.

# ५. तृतीय वर्ष बी.ए. (मार्ग परिवहन)

## ५.१ प्रवेश पात्रता

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात यापूर्वी बी.ए. (मार्ग परिवहन) द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेले सर्व विद्यार्थी.

## ५.२ अभ्यासक्रम संरचना

| *अ.क्र.* | *अभ्यासक्रम व संकेतांक* | *श्रेयांक* | एकूण संपर्कसत्रे |
|---|---|---|---|
| १. | प्रवास व पर्यटन आणि प्रवासी वाहतुकीसाठी ग्राहक सेवा (BRT301) | ०६ | ०९ |
| २. | रस्ते वाहतूक परिचालन व्यवस्थापन (BRT302) | ०६ | ०९ |
| ३. | वखार पालन व आंतर-मार्गीय वाहतूक प्रणाली (BRT303) | ०६ | ०९ |
| ४. | रस्ते सुरक्षा (BRT304) | ०६ | ०९ |
| ५. | संगणकीय साक्षरता (ICT002) | ०६ | ०९ |
| ६. | मानवी विनिमय आणि समायोजन (PSY270) | ०६ | ०९ |

## ५.३ शिक्षणक्रम शुल्क

| | | | |
|---|---|---|---|
| विद्यापीठ शुल्क | : | रु. | २०७५=०० |
| अभ्यासकेंद्र शुल्क | : | रु. | ९२५=०० |
| **एकूण शुल्क** | **:** | **रु.** | **३०००=००** |

● **विद्यापीठ शुल्काचा तपशील**

| *अ.क्र.* | *तपशील* | *शुल्क (रु.)* |
|---|---|---|
| ०१. | प्रवेश व नोंदणी शुल्क | १००=०० |
| ०२. | शैक्षणिक शुल्क | १११५=०० |
| ०३. | अंतर्गत मूल्यमापन | ७०=०० |
| ०४. | परीक्षा | ४८०=०० |
| ०५. | पदविका प्रमाणपत्र | ३००=०० |
| ०६. | आपत्कालीन सहायता निधी | १०=०० |
| | **एकूण शुल्क (रु.)** | **२०७५=००** |

## ५.४ मूल्यमापन प्रक्रिया

■ **अंतर्गत मूल्यमापन**

तृतीय वर्षाच्या सहा अभ्यासक्रमांची (एकत्रित) एक चाचणी परीक्षा अंतिम परीक्षेच्या अगोदर घेण्यात येईल. ही परीक्षा ऑनलाईन

पद्धतीने घेण्यात येईल व यातील सर्व प्रश्न हे वस्तुनिष्ठ स्वरूपाचे असतील. ही परीक्षा एकूण १२० गुणांची (प्रत्येक अभ्यासक्रमाला २० गुण) ९० मिनिटे कालावधीची असेल.

### ■ अंतिम मूल्यमापन

तृतीय वर्षाची सर्व सहा अभ्यासक्रमांची परीक्षा ही मे/जून २०१५ मध्ये Online पद्धतीने घेण्यात येईल. अंतिम परीक्षा ही सर्व सहा अभ्यासक्रमांची स्वतंत्रपणे घेण्यात येईल. ही परीक्षा पुस्तकांवर आधारित असेल व सर्व प्रश्न हे वस्तुनिष्ठ स्वरूपाचे असतील.

१. तृतीय वर्षाच्या प्रत्येक अभ्यासक्रमामध्ये उत्तीर्ण होण्याकरिता विद्यार्थ्याला अंतिम परीक्षेत ८० गुणांपैकी कमीत-कमी ३२ गुण मिळविणे तसेच अंतिम परीक्षा व चाचणी परीक्षा या दोन्हींमध्ये एकूण किमान ४० गुण मिळविणे अनिवार्य आहे.

२. जे विद्यार्थी अंतिम परीक्षेत अनुतीर्ण होतील त्यांनाच पुनर्परीक्षेचा अर्ज भरता येईल.

३. जे विद्यार्थी प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षाचे सर्व अभ्यासक्रम उत्तीर्ण होतील त्यांनाच पदवी देण्यात येईल. द्वितीय आणि तृतीय वर्ष बी.ए. (मार्ग परिवहन) अभ्यासक्रमाच्या परीक्षेच्या गुणांवरच पदवी देण्यात येईल.

## ६. कालावधी

मुक्त शिक्षणपद्धतीत विद्यार्थी काम करताकरता शिक्षण घेत असल्यामुळे अध्ययन-कालावधीबाबत लवचीक धोरण ठेवण्यात आले आहे. त्यामुळे एका वर्षात करावयाचा अभ्यास विद्यार्थी आपल्या सोईने ते वर्ष संपल्यानंतरही करू शकतो. म्हणून बी.ए.(मार्ग परिवहन) पदवी शिक्षणक्रम तीन वर्षांचा असला तरी विद्यार्थ्यांस तो आपल्या सोईने आठ वर्षांपर्यंत पूर्ण करण्याची मुभा देण्यात आली आहे. अभ्यास पूर्ण झाल्याची खात्री झाल्यावर परीक्षा देता येण्याची स्वायत्तता विद्यार्थ्याला देण्यात आली आहे. वर्षातून दोन वेळा परीक्षेची संधी उपलब्ध असल्याने विद्यार्थी आपल्या सोईने योग्य वेळी परीक्षा देऊ शकतो. समजा आपण प्रथम वर्षाची अंतिम परीक्षा दिली परंतु एकही अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करू शकला नाहीत (म्हणजे ४०% गुण मिळविले नाही) तरी आपणांस द्वितीय वर्ष (मार्ग परिवहन) प्रवेश दिला जाईल. तसेच द्वितीय वर्षाची अंतिम परीक्षा दिली परंतु एकही अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करू शकला नाहीत (म्हणजे ४०% गुण मिळविले नाही) तरी आपणास तृतीय वर्षास (मार्ग परिवहन) प्रवेश दिला जाईल. मात्र परीक्षा विभागाच्या नियमाप्रमाणे आपणास परीक्षा अर्ज भरता येईल व परीक्षा देता येईल.

## ७. माध्यम

इंग्रजी, मराठी, हिंदी माध्यम राहील.

## ८. नोंदणी प्रक्रिया

**या वर्षापासून या शिक्षणक्रमाची नोंदणी ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. ऑनलाईन पद्धतीने नोंदणी कशी करायची याची सविस्तर मार्गदर्शनपर टिपणी स्वतंत्रपणे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ठेवली आहे. अभ्यासकेंद्रावरही ती उपलब्ध आहे. ती काळजीपूर्वक वाचावी. अभ्यासकेंद्राची मदतही तुम्ही घेऊ शकता.**

ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी तुम्हाला संगणक, इंटरनेट, स्कॅनर सुविधा वापरावी लागणार आहे. अशी सोय उपलब्ध करून देणाऱ्या संस्था त्यासाठी वेगळे सेवा शुल्क आकारतात. हे शुल्क देण्याची जबाबदारी तुमची असेल. त्यासंदर्भात विद्यापीठाशी संपर्क साधू नये.

ऑनलाईन प्रवेश-अर्ज भरताना काही अडचण आल्यास विद्यापीठाच्या हेल्पडेस्क/हेल्पलाईनशी तुम्ही संपर्क साधू शकता.

**हेल्पलाईन क्रमांक** : ०२५३ - २२३०११८

**हेल्पडेस्क ईमेल** : helpdesk@ycmou.digitaluniversity.ac

### ● महत्त्वाच्या बाबी

१. ऑनलाईन परीक्षेसाठी ऑनलाईन स्लॉट बुकिंग करणे अनिवार्य आहे.

२. परीक्षेचे प्रवेशपत्र (Hall-Ticket) आपल्या अभ्यासकेंद्रावर परीक्षेच्या साधारणपणे १५ दिवस अगोदर उपलब्ध होईल.

३. परीक्षेचे प्रवेशपत्र (Hall-Ticket) विद्यापीठाच्या वेबसाईटवरूनही ई-सुविधा मार्फत विद्यार्थ्याला स्वतः काढता येईल.

४. प्रत्येक विद्यार्थ्याने परीक्षा विद्यापीठाने निर्धारित केलेल्या परीक्षा केंद्रावर द्यावयाची आहे. तसेच परीक्षेपूर्वी प्रवेशपत्रात, आपल्याशी संबंधित दिलेली माहिती योग्य असल्याचे पडताळून पाहणे गरजेचे आहे.

### ● अत्यंत महत्त्वाचे

**बी.ए. (मार्ग परिवहन) शिक्षणक्रमासंबंधी विद्यापीठाकडून वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचनांबाबत अद्ययावत राहण्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर नियमित भेट देणे आवश्यक आहे.** तसेच प्रथम वर्ष बी.ए. (मार्ग परिवहन) शिक्षणक्रमासाठी तयार करण्यात आलेले विविध अपारंपरिक अध्ययन साहित्य जसे ई-लर्निंग मॉड्यूल्स, कम्युनिटी रेडिओ कार्यक्रम, इत्यादीदेखील विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. (विद्यापीठाचे संकेतस्थळ : http://ycmou.digitaluniversity.ac)

# ९. विभागीय केंद्रे

| क्र. | विभाग | संपर्कासाठी पत्ता | दूरध्वनी |
|---|---|---|---|
| (१) | **अमरावती** | विभागीय संचालक,<br>मुक्त विद्यापीठाचे<br>अमरावती विभागीय केंद्र,<br>व्ही. एम. व्ही.<br>ते वलगाव रोड,<br>पोस्ट व्ही. एम. व्ही.<br>अमरावती – ४४४ ६०४ | (०७२१)<br>कार्या : २५३१४४५<br>फॅक्स : २५३१४४४ |
| (२) | **औरंगाबाद** | विभागीय संचालक,<br>मुक्त विद्यापीठाचे<br>औरंगाबाद विभागीय केंद्र,<br>सर्वे नं.४१, सैनिकी मुलांच्या<br>वसतिगृहाच्या पूर्वेस,<br>नंदनवन कॉलनी, छावणी,<br>औरंगाबाद – ४३१ ००२ | (०२४०)<br>कार्या : २३७१०६६<br>कार्या : २३७१०७७<br>फॅक्स : २३७१०८८ |
| (३) | **मुंबई** | विभागीय संचालक,<br>मुक्त विद्यापीठाचे<br>मुंबई विभागीय केंद्र,<br>द्वारा : जगन्नाथ शंकरशेठ<br>म.न.पा.ची मराठी प्राथमिक<br>शाळा, दुसरा मजला<br>फ्रेअर ब्रीज (साऊथ)<br>नाना चौक, ग्रँट रोड,<br>मुंबई – ४०० ००७ | (०२२)<br>कार्या : २३८७४१८६<br>फॅक्स : २३८२६१३५ |
| (४) | **नागपूर** | विभागीय संचालक,<br>मुक्त विद्यापीठाचे<br>नागपूर विभागीय केंद्र,<br>राव बहादूर डी.<br>लक्ष्मीनारायण बंगला<br>विद्यापीठ क्रीडा परिसर,<br>लॉ कॉलेज कॅंपस,<br>अमरावती रोड,<br>रवीनगर चौक,<br>नागपूर – ४४० ००१ | (०७१२)<br>कार्या : २५५३७२४<br>फॅक्स : २५५३७२५ |
| (५) | **नाशिक** | विभागीय संचालक,<br>मुक्त विद्यापीठाचे<br>नाशिक विभागीय केंद्र,<br>महानगरपालिकेची<br>जुनी इमारत, दुसरा मजला<br>नवीन पंडित कॉलनी,<br>नाशिक – ४२२ ००२ | (०२५३)<br>कार्या : २३१७०६३<br>फॅक्स : २५७६७५६ |
| (६) | **पुणे** | विभागीय संचालक,<br>मुक्त विद्यापीठाचे<br>पुणे विभागीय केंद्र,<br>शाहीर अण्णाभाऊ<br>साठे प्रशालागृह,<br>महानगरपालिकेची<br>शाळा क्र. ५ (मुलांची),<br>६५४, सदाशिव पेठ<br>हौदासमोर, कुमठेकर मार्ग,<br>पुणे –४११ ०३० | (०२०)<br>कार्या : २४४९११०७<br>फॅक्स : २४४५७९१४ |
| (७) | **कोल्हापूर** | विभागीय संचालक,<br>मुक्त विद्यापीठाचे<br>कोल्हापूर विभागीय केंद्र,<br>शिवाजी विद्यापीठ परिसर,<br>पोस्ट ऑफिसजवळ,<br>विद्यानगर,<br>कोल्हापूर – ४१६ ००४ | (०२३१)<br>कार्या : २६०७०२२<br>फॅक्स : २६०७०२३ |
| (८) | **नांदेड** | विभागीय संचालक,<br>मुक्त विद्यापीठाचे<br>नांदेड विभागीय केंद्र<br>स्वामी रामानंद तीर्थ<br>मराठवाडा विद्यापीठ<br>क्रीडा इमारत,<br>नांदेड – ४२१ ६०६ | कार्या : (०२४६२)<br>२२९९४०<br>फॅक्स : ९९९९५० |
| (९) | **कल्याण** | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र<br>मुक्त विद्यापीठाचे विभागीय<br>केंद्र,<br>द्वाराः कै. खासदार प्रकाश<br>परांजपे स्पर्धा परीक्षा<br>प्रशिक्षण केंद्र,<br>कल्याण–डोंबिवली<br>महापालिकेची इमारत,<br>चंद्रभूषण प्लाझा,<br>मिश्रा कंपाउंड,<br>सहजानंद चौक (प.),<br>जि. ठाणे | मोबाईल:<br>९३२३१०८०४० |
| (१०) | सोलापूर | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र<br>मुक्त विद्यापीठाचे विभागीय<br>केंद्र<br>द्वारा दयानंद महाविद्यालय,<br>सोलापूर – ४१३००२ | मोबाईल:<br>९४२२२९२६७२ |

## १०. विशेष सूचना/ संपर्कासाठी

### (अ) अभ्यासकेंद्रासंबंधीच्या सूचना

०१. प्रवेशाची मुदत संपल्यानंतर संपर्कसत्रे केव्हा सुरू करण्यात येतील, त्यासंबंधी अभ्यासकेंद्रावर जाऊन वेळापत्रक पाहावे. ओळखपत्रावर अभ्यासकेंद्रप्रमुखांची स्वाक्षरी व शिक्का घ्यावा. अभ्यासकेंद्रात येताना व परीक्षेच्या वेळी ओळखपत्र असणे आवश्यक आहे.

०२. मुदतीत प्रवेश घेणाऱ्यास अध्ययन साहित्य अभ्यासकेंद्रावर मिळेल.

०३. विद्यापीठाशी आपण वेळोवेळी केलेला पत्रव्यवहार, फी भरल्याच्या पावत्या, इत्यादी कागदपत्रे जपून ठेवावीत. विद्यापीठ आपणास कायम नोंदणी क्रमांक (PRN = Permanent Registration Number) देते. प्रत्येक वेळेस पत्रव्यवहार करताना, अभ्याससाहित्य घेताना, परीक्षा देताना PRN लिहिणे आवश्यक आहे. PRN अभ्यासकेंद्रावरून मिळवावा.

०४. विद्यापीठाने स्थापन केलेल्या अभ्यासकेंद्राव्यतिरिक्त अन्य कोणत्याही खाजगी संस्था किंवा शिकवणी वर्गांना (क्लास) विद्यापीठाची मान्यता नाही. अशा संस्थेत किंवा 'क्लास'मध्ये प्रवेश घेतल्यास किंवा जादा शुल्क भरल्यास विद्यापीठ जबाबदार असणार नाही.

०५. अभ्यासकेंद्राशी सतत संपर्क ठेवणे आपल्या हिताचे आहे. पत्रव्यवहाराद्वारे आपणास माहिती न मिळाल्यास केंद्रावर माहिती मिळू शकेल.

### (आ) विद्यापीठाचे मुख्यालय

'ज्ञानगंगोत्री परिसर', गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२२.
दूरध्वनी क्र. (०२५३) २२३१७१४, २२३१७१५, २२३०२२७.

विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या नाशिक येथील कार्यालयात यावयाचे असेल तर अशोकस्तंभ बसस्टॉपवर सकाळी ९.३० व सायंकाळी ५.०० वाजता बसेस उपलब्ध आहेत. अशोकस्तंभ मध्यवर्ती बस (जुने सी.बी.एस.) स्थानकापासून जवळ आहे.

विद्यापीठ व विभागीय केंद्र यांच्या कार्यालयीन वेळा पुढीलप्रमाणे आहेत –

★ सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.४५ (दुपारी १.३० ते २ सुटी)

★ रविवार, प्रत्येक महिन्याचा पहिला व तिसरा शनिवार आणि शासकीय सुटीच्या दिवशी वरील कार्यालये बंद राहतील.

● **विशेष अडचणींबाबत संपर्क**

१. माहितीपुस्तिका, प्रवेश–अर्जाबाबत चौकशी/ अडचणी :
विभागीय संचालक, संबंधित विभागीय केंद्र

२. नोंदणी, नोंदणी क्रमांक, पत्ताबदल, केंद्रबदलः
संबधित विभागीय केंद्र

३. अध्ययन–साहित्य, पुस्तके, ध्वनिफिती, चित्रफिती, ओळखपत्र, इत्यादी :
भांडार अधिकारी, भांडार व जावक कक्ष
दूरध्वनी – २२३०१०७

४. अभ्यासक्रम / परीक्षेसंबंधीत अडचणी
संचालक, सहयोग व विशेष उपक्रम केंद्र
दूरध्वनी : (०२५३) २२३०००९/(०२५३) २२३०१७०

# ११. परिशिष्टे

## परिशिष्ट – १ : विद्यार्थी सहायता आणि विद्यार्थी कल्याण योजना

### ■ विद्यार्थी सहायता

अल्प उत्पन्न गटातल्या हुशार विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी साहाय्य योजना विद्यापीठातर्फे राबविली जाते. त्यासाठी विद्यापीठाने १५ लाखांची तरतूद केली आहे. या योजनेखाली आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेल्या शिक्षणक्रमासाठी असलेल्या शुल्कात ५०% सवलत देण्यात येते. त्यासाठी विद्यापीठाने विहित नमुना विकसित केला असून योग्य पात्रताधारक आणि कागदपत्रांची पूर्तता केलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश शुल्कात सवलत देण्यात येते.

### ■ विद्यार्थी कल्याण योजना

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी दरवर्षी क्रीडा व युवक महोत्सवांचे आयोजन करण्यात येते. तसेच  विद्यार्थ्यांमधील संशोधन प्रवृत्तीला प्रोत्साहन देण्यासाठी आविष्कार ही संशोधनात्मक स्पर्धाही घेण्यात येत असते.

### ■ क्रीडा महोत्सव

विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना खेळाचे मैदान मिळावे म्हणून विद्यापीठाने विभागीय व विद्यापीठ पातळीवर क्रीडा स्पर्धा सुरू केल्या आहेत. यातून खेळाडूंना राज्य व राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेत भाग घेता येतो. मा. राज्यपालांच्या कार्यालयाकडून आयोजित केल्या जाणाऱ्या आंतरविद्यापीठीय क्रीडा स्पर्धा व ए. आय. यू. च्या क्रीडास्पर्धेतही खेळाडूंना भाग घेता येतो. याचा लाभ २५ वर्षांखालील खेळाडूंना घेता येतो.

### ■ युवक महोत्सव

विद्यापीठाच्या कलावंत विद्यार्थ्यांना त्यांच्या कलागुणांचे प्रदर्शन करता यावे म्हणून विद्यापीठाने विभागीय व केंद्रीय स्तरावर युवक महोत्सव सुरू केला आहे. यात वक्तृत्व स्पर्धा, एकांकिका, नृत्य संगीत, गायन यांसारख्या स्पर्धा घेण्यात येतात. मा. राज्यपालांच्या कार्यालयाकडून आयोजित केल्या जाणाऱ्या इंद्रधनुष्य व ए.आय.यू. (भारतीय विद्यापीठ संघ) यांच्यातर्फे घेण्यात येणाऱ्या राष्ट्रीय युवक महोत्सवात कलावंत विद्यार्थ्यांना सहभाग घेता येतो.

### ■ आविष्कार

विद्यापीठ स्तरावरील विद्यार्थ्यांमधील संशोधन प्रवृत्तीला प्रोत्साहन देण्यासाठी मा. राज्यपाल यांच्या कार्यालयातर्फे दरवर्षी आविष्कार ही संशोधनात्मक स्पर्धा घेण्यात येते. या आंतरविद्यापीठीय संशोधन महोत्सवातही मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना भाग घेता येतो. मुक्त विद्यापीठात संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मुक्तविद्या नावाचे षण्मासिक प्रकाशित केले जाते.

### ■ संवादपत्रिका

राज्यभर पसरलेल्या मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांशी संपर्क साधण्यासाठी मुक्त विद्यापीठ संवादपत्रिका हे मासिक प्रकाशित केले जाते. विद्यार्थ्यांना उपयुक्त माहिती लेख, सूचना यांचा यात समावेश असतो. अध्ययनार्थ्यांमधील अभ्यासाची प्रेरणा व दूरशिक्षणाबाबत जागरूकता वाढविण्याचे कार्य ही पत्रिका करत असते. सदर संवादपत्रिका अभ्यासकेंद्रावर व वेबसाईटवर वाचण्यासाठी उपलब्ध असेल.

### ■ आभासी वर्ग

विद्यार्थ्यांना उपग्रहाच्या माध्यमातून शिक्षण घेणे शक्य व्हावे म्हणून विद्यापीठाने अहमदाबाद येथील भारत सरकारच्या भारतीय अंतरिक्ष अनुसंधान संघटन (इस्रो) या संस्थेच्या मदतीने एज्युसॅट या उपग्रह वाहिनीद्वारा (सॅटेलाईट चॅनल) दूरशिक्षणाचा प्रकल्प सुरू केला आहे. या प्रकल्पांतर्गत राज्यात एकूण ४० व्हर्च्युअल लर्निंग सेंटर कार्यान्वित केलेली आहे. याद्वारे थेट संपर्कसत्रे घेण्यात येतात.

### ■ राष्ट्रीय सेवा योजना

पारंपरिक विद्यापीठांप्रमाणेच मुक्त विद्यापीठाच्या १५०० विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय सेवा योजना काही अभ्यासकेंद्रांवर सुरू करण्यात आली आहे.

**(टीप : वरील योजनांचा लाभ हा शिक्षणक्रम उत्तीर्ण झाल्यावर पदवी शिक्षणक्रमासाठी प्रवेश घेतल्यावर घेता येऊ शकतो.)**

# परिशिष्ट – २ : शासन निर्णय (यू.जी.सी.)

## University Grants Commission Resolution (2004)

विश्वविद्यालय अनुदान आयोग
बहादुरशाह जाफर मार्ग
नई दिल्ली–११० ००२
**UNIVERSITY GRANTS COMMISSION**
**BAHADURSHAH ZAFAR MARG**
**NEW DELHI-110002**

F1-52/2000(CPP-II) 5 MAY 2004

The Registrar / Director
Of all the Indian Universities
(Deemed, State, Central Universities /
Institutions of National importance)

Subject : Recognition of Degrees awarded by Open Universities.

Sir/Madam,

There are a number of open Universities in the country offering various degrees/diploma through the mode of non-formal education. **The Open Universities have been established in the country by an Act of Parliament or State Legislature in accordance with the provisions contained in Section 2(f) of University Grants Commission Act, 1956. These universities are, therefore, empowered to award degrees in terms of Section 22(1) of the UGC Act, 1956.**

A circular was earlier issued vide UGC letter N.F.1-8/92(CPP) dated February, 1992 mentioning that the Certificate, Diplomas and Degrees awarded by Indira Gandhi National Open University are to be treated equivalent to the corresponding awards of the Universities in the country.

Attention is further invited to UGC circular No.F1-25/93(CPP-II) dated 28th July, 1993 (copy enclosed) for recognition of degrees and diplomas as well as transfer of credit for courses successfully completed by students between the two types of universities so that the mobility of students from Open University stream to traditional Universities is ensured without any difficulty.

The UGC has specified the nomenclature of degrees under Section 22(3) of the UGC Act, 1956 to ensure mandatory requirements viz. minimum essential academic inputs required for awarding such degrees. A copy of Gazette Notification regarding specification of degrees issued vide No.1-52/97(CPP-II) dated 31st January 2004 is enclosed. The details are also given in UGC Web site : www.ugc.ac.in

**May, I therefore request you to treat the Degrees / Diploma / Certificates awarded by the Open Universities in conformity with the UGC notification on Specification of Degrees as equivalent to the corresponding awards of the traditional Universities in the country.**

Yours faithfully

**(Dr. Mrs. Pankaj Mittal)**
**Joint Secretary**

**Encl. : As Above**
**Copy to :**

1. The Secretary, Government of India, Ministry of Human Resource Development, Department of Secondary Education and Higher Education, Shastri Bhavan, New Delhi-110001.
2. The Secretary, All Indian Council for Technical Education, I.G. Sports Complex, Indraprastha Estate, New Delhi
3. The Secretary, Association of Indian Universities (AIU), 16, Comrade Inderjit Gupta Marg, New Delhi -110002.
4. The Secretary, National Council for Teacher Education, I.G. Stadium, I. P. Estate, New Delhi-110002.
5. The Director of Distance Education Council, IGNOU Campus, Maidan Garhi, New Delhi-110068.
6. The Vice-Chancellor, Indira Gandhi National Open University, Maidan Garhi, New Delhi-110068.
7. The Vice-Chancellor, Dr. B. R. Ambedkar Open University, Road, No. 46, Jubilee Hills, Hyderabad (AP)
8. The Vice-Chancellor, Nalanda Open University, West Gandhi Maidan, Patna-800001 (Bihar)
9. The Vice-Chancellor, Dr. Babasaheb Ambedkar Open University, Shahigaug, Ahmedabad-380003 (Gujarat)
10. The Vice-Chancellor, Karnataka State Open University, Manasagangotri, Mysore-570006 (Karnataka)
11. The Vice-Chancellor, Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik-422222 (Maharashtra)
12. The Vice-Chancellor, Kota Open University, Vardhaman Mahaveer Open University, Kota-324010 (Rajasthan)
13. The Vice-Chancellor, Netaji Subhash Open University, Kolkata-700020 (West Bengal)
14. The Vice-Chancellor, Madhya Pradesh Bhoj (Open) University, Bhopal-462016 (M.P.)

**(V.K. Jaiswal)**
**Under Secretary**

# परिशिष्ट – ३ : १०वी व १२वी समकक्षतेबाबत शासन निर्णय

**यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक व**
**राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्था, नवी दिल्ली यांची**
**प्रमाणपत्रे शासनसेवेसाठी समकक्ष म्हणून विचारात घेण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : आरजीडी–१५११/प्र.क्र.८९/१३,
मंत्रालय, विस्तार इमारत, मुंबई–४०००३२
दिनांक : २० मे, २०११.

**वाचा**

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : आरजीडी–१३९८/प्र.क्र.६७/ ९८/१३, दिनांक १० डिसेंबर, १९९८.

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : आरजीडी–१३०५/प्र.क्र.२४/ २००५/१३, दिनांक १२ डिसेंबर, २००६.

**शासन निर्णय :**

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक येथून प्राप्त केलेली शैक्षणिक अर्हता शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी ग्राह्य धरण्याबाबत सर्वसाधारण सूचना निर्गमित करण्याचे निदेश मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण, मुंबई यांनी श्री. राजेंद्र घुणकीकर विरुद्ध महाराष्ट्र शासन (मूळ अर्ज क्र. ६७०/२००८) वर दिले आहेत. त्यावर, शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार यासंदर्भात खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

''ज्या पदांच्या सेवाप्रवेश नियमात १० वी/१२ वी (माध्यमिक/उच्च माध्यमिक) परीक्षा उत्तीर्ण असणे अशी किमान अर्हता विहित केलेली असेल त्या बाबतीत, महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाची माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण नसलेला मात्र, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची पूर्व परीक्षा उत्तीर्ण होऊन पदवी परीक्षेचे प्रथम वर्ष उत्तीर्ण झालेला **वा** यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातून पदवी धारण केलेला उमेदवार पात्र समजण्यात यावा.''

२. बृहन्मुंबईतील लिपिक–टंकलेखक पदावरील नियुक्तीसाठी विहित करण्यात आलेल्या सेवाप्रवेश नियमातील २ (इ) मध्ये ''महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाने नियंत्रित केलेली माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा आणि या परीक्षेस समकक्ष घोषित केलेल्या इतर परीक्षा अंतर्भूत असल्याचे नमूद केले आहे.'' तसेच, उमेदवारांकडे महाराष्ट्र राज्यातील अधिवास प्रमाणपत्र असणेही आवश्यक आहे. राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्थान, नवी दिल्ली या विद्यालयाची माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण केलेल्या एका उमेदवाराने महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकारणाकडे दाखल केलेल्या प्रकरणात (मूळ अर्ज क्रमांक २०४/२०१०) राज्य शासनाने लवकरात लवकर निर्णय घ्यावा, असे आदेश दिले आहेत. केंद्र शासनाने कायद्यान्वये स्थापन केलेल्या राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्था, नवी दिल्ली (National Institution of Open Schooling, New Delhi) या विद्यालयाची माध्यमिक शालांत परीक्षा (किमान ५ विषयांसह) उत्तीर्ण केलेल्या उमेदवारांना शालेय शिक्षण विभागाने अकरावी प्रवेशासाठी पात्र ठरविले आहे. मात्र, शासन सेवेतील नियुक्तीसंदर्भात समकक्षतेबाबत कोणतेही आदेश नाहीत. केंद्रिय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने सर्व राज्यांना, राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्था, नवी दिल्ली (National Institute of Open Schooling, New Delhi) यांच्याकडून दिली जाणारी प्रमाणपत्रे उच्च शिक्षण व नोकरीसाठी (Employment) ग्राह्य (समकक्ष) धरण्याबाबत कळविले आहे. ही बाब विचारात घेऊन, राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्था, नवी दिल्ली यांच्यामार्फत माध्यमिक शालांत परीक्षेबाबत दिलेले प्रमाणपत्र, माध्यमिक शालांत परीक्षा अशी अर्हता असलेल्या पदांवर नियुक्तीसाठी ग्राह्य धरण्याची बाब देखील शासनाच्या विचाराधीन होती. त्यावर, शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार यासंदर्भात खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

''राष्ट्रीय मुक्त विद्यालय संस्था, नवी दिल्ली यांची (मराठी व इंग्रजीसह किमान ५ विषयांसह) शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व सदर प्रमाणपत्र (Secondary School Examination Certificate) धारण करणाऱ्या उमेदवारांनी, राज्य शासन सेवेमध्ये ज्या ज्या ठिकाणी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण अशी अर्हता विहित केली असेल त्या त्या ठिकाणी शासन सेवेसाठी शालांत परीक्षा समकक्ष पात्रता आपोआप धारण केली आहे असे समजण्यात यावे.''

३. त्यानुसार, सर्व नियुक्ती प्राधिकारी यांनी कार्यवाही करावी. हे आदेश या आदेशाच्या दिनांकापासून तात्काळ अंमलात येतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०११०५२०१३५११०४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(बा. वि. निकम)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

## परिशिष्ट – ४ : शासन निर्णय

# मुक्त विद्यापीठाच्या पदव्यांना समकक्षता व शासनमान्यता

**(१) अन्य विद्यापीठांच्या पदवीशी समकक्षता**

मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य यांच्या पत्र क्र. समक (उ. शि.)/१०९४/३२८६१/मवि-१, दि. ३० ऑक्टोबर १९९५ च्या पत्रान्वये 'केंद्रीय किंवा राज्य विधिमंडळाने अधिनियमाद्वारे भारतातील विद्यापीठाने दिलेली पदवी/पदविका आणि संसदेने अधिनियमाद्वारे इतर शैक्षणिक संस्था प्रस्तावित केलेल्या आहेत किंवा विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम (१९५६) मधील कलम क्र. ३ अन्वये मानीव विद्यापीठे घोषित केली आहेत अशांच्या बाबतीत पदवी किंवा पदविका मान्यता देण्याबाबतचे औपचारिक आदेश विद्यापीठाने काढण्याची आवश्यकता नाही'.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे महाराष्ट्र राज्याच्या विधिमंडळाने अधिनियमाद्वारे (कायदा क्र. २०/१९८९) स्थापन केलेले विद्यापीठ असून त्यास विद्यापीठ अनुदान आयोगाचीही मान्यता आहे. **त्यामुळे या विद्यापीठाची पदवी इतर विद्यापीठांच्या पदवीशी समकक्ष आहे.**

**(२) विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता**

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी त्यांचे पत्र क्र. F/S-15/89 (CPP-I) दि. ८ डिसेंबर १९९२ नुसार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १९५६ च्या कायद्यातील कलम १२-बी अन्वये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास मान्यता दिली आहे.

**(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता**

उपसचिव व परीक्षा नियंत्रक, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांच्या पत्र क्र. १४७७ (१७/१९९४/कक्ष) **दि. १७ फेब्रुवारी १९९४ च्या पत्रातील मान्यतेसंबंधीचा मजकूर – 'यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे संविधिमान्य (Statutory) असल्यामुळे आपल्या विद्यापीठाच्या पदवीधर विद्यार्थ्यांकडून आलेले अर्ज देखील इतर मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवीधर उमेदवारांकडून आलेल्या अर्जांप्रमाणेच आयोगाकडून विचारात घेतले जातील'**

# मुक्त विद्यापीठाच्या पदवी/पदविकांना महाराष्ट्र शासनमान्यता

विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिलेली विद्यापीठे

राज्य सेवेतील पदासांठी पदवी/पदविकास मान्यता

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग

**शासन निर्णय** : क्रमांक आरजीडी-१३९४/प्र.क्र. २१/९४/१३,मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक ८ मार्च १९९५

**वाचा** : (१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक आरजीडी-१०६१/१८९६७/११४ - जे दिनांक २१ ऑगस्ट १९६९

**शासन निर्णय** : महाराष्ट्र लोक सेवा आयोगाशी विचार विनिमय करून उपरोक्त दिनांक २१ ऑगस्ट १९६९ च्या आदेशाद्वारे असा निर्णय घेण्यात आला होता की, केंद्र अथवा राज्य विधिमंडळाच्या अधिनियमाद्वारे स्थापित झालेली विद्यापीठे, संसदेच्या अधिनियमाद्वारे स्थापन झालेल्या इतर शैक्षणिक संस्था, किंवा विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, १९५६ च्या अंतर्गत भाग ३ अन्वये जाहीर झालेली मानवी विद्यापीठे यांनी प्रदान केलेल्या पदव्या / पदविका तसेच भारतीय वैद्यकीय मंडळ अधिनियम, १९५६ च्या परिशिष्टांमध्ये अंतर्भूत केलेल्या वैद्यकीय व संलग्न विषयामधील पदव्या यांना शासकीय महाविद्यालयातील अध्यापकीय पदे वगळता, **राज्यातील सेवा व पदांवरील भरतीसाठी आपोआप मान्यता प्राप्त झाली असल्याचे समजण्यात यावे.**

(२) सदर आदेशासोबत विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिलेल्या वैधानिक विद्यापीठे व संस्थांची यादी जोडण्यात आली होती. आयोग मान्यताप्राप्त विद्यापीठे व संस्था यांची अद्ययावत यादी आता या आदेशासोबत जोडण्यात आली आहे. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरजीडी - १०६१/१८९६७/९१४/जे दिनांक २१ ऑगस्ट १९६९ मध्ये नमूद केलेल्या आणि वर परिच्छेद १ मध्ये उद्धृत केलेल्या हेतूसाठी सदर सर्व विद्यापीठे/संस्था यांनी प्रदान केलेल्या पदवी/पदविकांना आपोआप मान्यता देण्यात आल्याचे समजण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

दा. र. राणे
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
(१) राज्यपालांचे सचिव
(२) मुख्य मंत्र्यांचे सचिव
(३) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
(४) महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई
(५) महालेखापाल, महाराष्ट्र -२, मुंबई
(६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
(७) अभिदान व लेखा अधिकारी, मुंबई
(८) प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा), मुंबई
(९) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
(१०) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
(११) सर्व मंत्रालयीन शिक्षण
(१२) मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
(१३) अवर सचिव, भारत सरकार, शिक्षण मंत्रालय, नवी दिल्ली
(१४) निवड नस्ती

**वाचा : महाराष्ट्र शासनाच्या उपरोक्त शासन निर्णय क्रमांक आर.जी.डी. १३९४/प्र.क्र.२१/९४/१३ मंत्रालय, मुंबई. दिनांक ८ मार्च १९९५ च्या सोबत जोडलेल्या यादीमध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांची अनुक्रमांक १४६ वर नोंद करण्यात आलेली आहे.**

## निर्मिती

श्री. आनंद यादव

व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२


© २०१४, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक


- **प्रथम प्रकाशन** : जुलै २०१४
- **डी.टी.पी.** : अनुरथ वाघमारे
- **प्रकाशक** : डॉ. प्रकाश अतकरे, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२.

**Anurath/AP14-182**